इतिहास



नायक बनता बनता दिग्दर्शक बनलेले मोहन सायगल

अभिनेता बनण्याचं स्वप्न बाजूला ठेवून दिग्दर्शनाकडे वळलेले मोहन सायगल आपल्या चित्रपटात एखाद्याच दृश्यातून पडद्यावर चमकण्याची हौस भागवून घेत...

□ इसाक मुजावर

निर्माता-दिग्दर्शक सुभाष घई अभिनेता बनायला चित्रपटक्षेत्रात आले होते. पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमधून अभिनयाचा रीतसर डिप्लोमा घेऊन *तकदीर, आराधना, उमंग, ग्रहण*सारख्या काही चित्रपटांत सुरुवातीच्या काळात त्यांनी भूमिका केल्या होत्या, पण त्यानंतर ते अभिनेत्याचे दिग्दर्शक बनले. आणि मग पाहता पाहता निर्मातादेखील. त्यांचा अभिनेत्याचा चेहरा यामुळेच त्यानंतरच्या काळात हळूहळू पुसला गेला आणि त्यांच्या स्वतःच्या चित्रपटातील एखाद् दुसऱ्या दृश्यात गंमत म्हणून दिसू लागला. सुभाष घईंच्या याच यशाची आठवण करून देणारे एक निर्माते-दिग्दर्शक पन्नासच्या दशकात आपल्या चित्रपटव्यवसायात होते. त्यांचं नाव मोहन सायगल. सुभाष घईंच्याप्रमाणे अभिनेता म्हणूनच ते चित्रपटव्यवसायात आले होते. अभिनयाबरोबरच नृत्याचंदेखील त्यांना अंग होतं. अभिनेता बनण्यापूर्वी ते अलमोडा येथील उदयशंकर यांच्या डान्स ट्रूपमध्ये होते. त्यांच्याबरोबर गुरुदत्तदेखील तेव्हा या डान्स ट्रूपमध्ये होते आणि गुरुदत्त यांच्याप्रमाणेच त्यांनादेखील नृत्याचं चांगलं अंग होतं. १९४५-४६च्या सुमारास चित्रपटक्षेत्रात प्रवेश करण्यासाठी गुरुदत्त अलमोड्याहून मुंबईला आले. मोहन सायगलही तेव्हाच अलमोड्याहून मुंबईला आले आणि १९४८ला पुण्याच्या नवयुग फिल्म कंपनीने निर्माण केलेल्या *फूल और कांटे* या चित्रपटात अभिनेत्री शालिनीबरोबर नायकाची भूमिका करून आपलं अभिनयजीवन त्यांनी सुरू केलं. १९५३च्या देव आनंदच्या नवकेतनच्या *हमसफर* या चित्रपटात त्यांनी लंगड्याची चरित्र भूमिका केली होती. पण त्यानंतर पाहता पाहता ते अभिनेत्याचे दिग्दर्शक बनले. १९५४चा कुलदीप पिक्चर्सचा *औलाद* त्यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट. *फूल और कांटे, हमसफर*सारख्या काही चित्रपटांत भूमिका केल्यावरही नट म्हणून कोणी त्यांची दखल घेतली नाही. पण *औलाद* या पहिल्याच चित्रपटात दिग्दर्शक म्हणून सर्वांनी त्यांची दखल घेतली. त्यानंतर *अधिकार, डॉ. विद्या, अपना हाथ जगन्नाथ, लाजवंती, करोडपती, देवर* यासारखे अनेक चित्रपट त्यांनी दिले. १९५६चा *नई दिल्ली* त्यांनीच दिग्दर्शित केलेला एक यशस्वी चित्रपट.


हसरत जयपुरी


शैलेंद्र


दिग्दर्शक म्हणून मान्यता मिळाल्यावर सुभाष घईंनी कोणत्याच चित्रपटात कधी नायकाची भूमिका केली नाही. तरीही आपल्या प्रत्येक चित्रपटात एखाद्या तरी दृश्यात ते पडद्यावर येतातच. मोहन सायगल त्यांच्या काळात हेच करायचे. आपल्या प्रत्येक चित्रपटात एखाद्या तरी दृश्यात आपला चेहरा ते पडद्यावर दाखवायचेच. *नई दिल्ली*तील एका दृश्यात देखील आपला चेहरा त्यांनी पडद्यावर दाखवलाच होता. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या *औलाद* या पहिल्या चित्रपटाची कथा पं. मुखराम शर्मांनी लिहिली होती. प्रभातच्या काळापासून ते चित्रपट कथा लिहायचे. पण यशस्वी चित्रपट कथालेखक म्हणून त्यांना मान्यता मिळाली ती मोहन सायगलनी दिग्दर्शित केलेल्या *औलाद* या पहिल्या चित्रपटात. *अधिकार* त्यांनी दिग्दर्शित केलेला दुसरा चित्रपट. *औलाद*बरोबरच १९५४ला हा चित्रपट पडद्यावर आला होता. या चित्रपटाची कथादेखील पं. मुखराम शर्मा यांचीच होती. *औलाद* व *अधिकार* हे दोन चित्रपट मोहन सायगलनी फक्त दिग्दर्शित केले होते. त्यानंतर 'डिलक्स फिल्म्स' ही स्वतःची चित्रसंस्था स्थापन करून ते दिग्दर्शकाचे निर्माते बनले. *नई दिल्ली* त्यांनी निर्माण केलेला पहिला चित्रपट. या चित्रपटाची कथा पं. मुखराम शर्मांनीच लिहिली होती. ही कथा सुरुवातीला एक हिंदू युवक व मुस्लीम युवती यांची प्रेमकथा होती. पण या चित्रपटाच्या निर्मितीची तयारी चालू असतानाच

उत्तर प्रदेशात हिंदू-मुस्लीम यांच्यात जातीय दंग्याचा वणवा पेटला. या वणव्यात हिंदू युवक व मुस्लीम युवती यांची प्रेमकथा दाखवणारा चित्रपट पडद्यावर आला तर या चित्रपटाविरुद्ध निदर्शनं होतील अशी भीती मोहन सायगल व पं. मुखराम शर्मा यांना वाटली. आणि त्यांनी कथेत बदल करून पंजाबी युवक व दाक्षिणात्य युवती यांच्या प्रेमकथेचा रंग या चित्रपटाला दिला. भाषावार प्रांतरचनेसाठी जी चळवळ आपल्या देशात तेव्हा सुरू झाली होती त्या कथेची पार्श्वभूमी या चित्रपटाला देऊन.

किशोरकुमार या चित्रपटाचा नायक होता. *औलाद*नंतर मोहन सायगलनी दिग्दर्शित केलेल्या *अधिकार* या दुसऱ्या चित्रपटात किशोरकुमार नायक होता. हा चित्रपट चांगलाच यशस्वी ठरला होता. यामुळे मोहन सायगलनी *नई दिल्ली*त किशोरकुमारला पुन्हा रिपीट केला. वैजयंतीमाला या चित्रपटात त्याची नायिका होती. प्रदीपकुमार व दिलीपकुमार या दोघांच्याबरोबर वैजयंतीमालाची जोडी तेव्हा चांगलीच जमली होती. पण त्या दोघांच्या आधी ज्याच्याबरोबर तिची जोडी जमलीय असा नायक होता किशोरकुमार. १९५३चा *लडकी* त्या दोघांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट. हा चित्रपट चांगला हीट ठरला होता आणि त्यानंतर त्या दोघांची भूमिका असलेला १९५४चा *पहली झलक* हा चित्रपट देखील हीट ठरला होता. मोहन सायगलनी *नई दिल्ली*त किशोरकुमारबरोबर नायिकेची भूमिका करण्यासाठी वैजयंतीमालाची निवड केली याचं हे एक कारण होतंच. त्याचबरोबर आणखी एक कारण होतं. या चित्रपटाची नायिका दाक्षिणात्य होती. वैजयंतीमालाही दाक्षिणात्य असल्यामुळे तीच या भूमिकेत एकदम शोभून दिसेल, असं मोहन सायगलना वाटत होतं.

१९५३ साली राजा परांजपेंनी दिग्दर्शित केलेला एक हिंदी चित्रपट आला होता *चाचा चौधरी*. हा चित्रपट १९५२च्या त्यांच्या *पेडगावचे शहाणे* या लोकप्रिय मराठी चित्रपटाचा हिंदी अवतार होता. *पेडगावचे शहाणे*मधील आपली शीर्षक भूमिका राजा परांजपेंनी या हिंदी चित्रपटातदेखील केली होती. शहाणेंच्या ऐवजी चौधरी बनून त्यांच्याबरोबर मराठी *पेडगावचे शहाणे*मधील आणखी एकच मराठी कलाकार चाचा चौधरीत रिपीट झाला होता, धुमाळ.

त्यांची आठवण निघाली तर अनेकांना आजही आठवतो हिंदी चित्रपटातील दाक्षिणात्य भूमिकेतला त्यांचा चेहरा. *पेडगावचे शहाणे* या मराठी चित्रपटातील सारंगमामाच्या भूमिकेने त्यांना दाक्षिणात्य भूमिकेचा चेहरा दिला. *पेडगावचे शहाणे*मधील दाक्षिणात्य भूमिकेचा चेहरा घेऊनच *चाचा चौधरी*द्वारा ते हिंदीत आले. *चाचा चौधरी* चालला नाही. पण या चित्रपटातील दाक्षिणात्य भूमिकेतील त्यांचा चेहरा मात्र त्यानंतर हिंदीत चांगलाच चालला. *नई दिल्ली*तील त्यांची भूमिका *चाचा चौधरी*तील त्यांच्या दाक्षिणात्य नोकराच्या भूमिकेची आठवण करून देणारी भूमिका होती. *नई दिल्ली*च्या लोकप्रियतेमुळे दाक्षिणात्य नोकराची त्यांची भूमिका हिंदीत चांगलीच लोकप्रिय ठरली. आणि अनेक चित्रपटात रिपीट झाली. किशोरकुमार, वैजयंतीमाला, धुमाळ यांच्याबरोबर *नई दिल्ली*तील अन्य कलाकार होते जबीन, प्रभू दयाल, राधा किशन, नसीर हुसेन, नाना पळशीकर, मुमताज बेगम, मिरजकर, शिवराज, शीला काश्मिरी. जबीन या चित्रपटात किशोरकुमारची वहीण बनली होती. १९५८च्या *रागिनी*त तिने किशोरकुमारच्या प्रेयसीची भूमिका केली होती. *नई दिल्ली*च्या यशामुळे मोहन सायगल यांची 'डिलक्स फिल्म्स' ही चित्रसंस्था मजबूत पायावर उभी राहिली आणि त्यानंतर ही चित्रसंस्था केवळ एक चित्रसंस्था उरली नाही. अनेक कलावंतांचे भवितव्य घडवणारी एक शाळा बनून गेली. नरेंद्र सूरी, राजेंद्र भाटिया, जे. ओमप्रकाश हे निर्माते-दिग्दर्शक या शाळेनेच घडवले.



रेखाला हसतखेळत स्टेप्स् दाखवताना मोहन सायगल



पं. मुखराम शर्मा

*नई दिल्ली*चे संगीतकार होते शंकर-जयकिशन. किशोरकुमारने नायक व पार्श्वगायक म्हणून त्यांच्या संगीतात अनेक चित्रपटात गाणी गायली. *नई दिल्ली* त्या दोघांना एकत्र आणणारा पहिला चित्रपट. या चित्रपटात किशोरकुमारने शंकर-जयकिशन यांच्या संगीतात 'अरे भाई निकल के आ घर से...', 'मिलते ही नजर आप मेरे दिल में भा गये...' व 'नखरेवाली देखने में देख लो है कैसी...' ही तीन गाणी गायली होती. या गाण्यांपैकी नखरेवाली हे गाणं इतकं लोकप्रिय झालं होतं की, १९६०ला या गाण्याचा मुखडा घेऊन *नखरेवाली* या नावचा एक चित्रपट पडद्यावर आला होता. वैजयंतीमालाची या चित्रपटातील भूमिका पूर्णपणे नृत्यमय होती. तिच्यासाठी लताबाईंनी या चित्रपटात 'तेरी मुरली बैरन भई हो कन्हैया तेरी...', 'कोई मेरे सपनो में आया...', 'तुम संग प्रीत लगाई रसिया...', 'गोरी तेरी सपनों के सजना, आए तेरे अंगना...', 'बारी बरस खटन गया...' व 'जिंदगी बहारे मुहब्बत की बहार से...' ही सहा गाणी गायली होती. आणि या सहाही गाण्यांवर या चित्रपटात ती नाचली होती. हे या चित्रपटातील तिच्या भूमिकेचं एक ठळक वैशिष्ट्य होतं. या सहा गाण्यांपैकी 'तुम संग प्रीत लगाई रसिया...' या गाण्यांवर या चित्रपटात तिने भांगडा नृत्य केलं होतं. 'मुरली बैरन भई...' व 'कोई सपने में आया...' ही या चित्रपटातील दोन गाणी हसरतनी लिहिली होती. बाकीची गाणी शैलेंद्रनी.